# प्रेसनोट दि.०३/०२/२०१८

## हाऊसमेड पुरवतो असे सांगुन आर्थिक फसवणुक करणाऱ्या आरोपीस सायबर क्राईम सेल पुणे शहर यांनी केली अटक

पाषाण येथे राहणाऱ्या विवाहित अभियंता महिलेस त्यांची मुले संभाळण्यासाठी व घरकामासाठी हाऊसमेडची आवश्यकता असल्याने त्यांनी जस्ट डाईल या सर्व्हीस प्रोव्हायडर कंपनीला फोन करुन माहिती विचारली होती. त्यानंतर मोबाईल नंबर ९६५७३४५८८४ वरुन संबंधीत महिलेस मेसेज आला की, त्यांचेकडे घरकाम करण्यासाठी लेडीज व नर्स उपलब्ध आहेत. त्यानंतर संबंधीत महिलेने मोबाईल नंबर ९६५७३४५८८४ वर फोन करुन विचारणा केली असता समोरील व्यक्तीने साई समर्थ इंटरप्रायजेसमधुन बोलत असुन त्यांच्याकडे घरमाकासाठी महिला उपलब्ध असल्याचे सांगितले व पिडीत महिलेच्या फोनवरील व्हाटसअॅप मेसेज करुन त्याचे दुकान लायनन्स व काही काम करणाऱ्या महिलांचे फोटो व माहिती पाठविली. पिडीत महिलेने घरकामासाठी एक महिलेची निवड केली व साई समर्थ इंटरप्रायजेस यांना त्याबाबत कळविले. त्यानंतर समोरील व्यक्तीने त्यांचे कमिशन १५,०००/- रुपये व मेडसाठी दोन महिन्याचे अडवॉन्स असे मिळुन एकुण २५,०००/- रुपये यस बँक अकाउंट नंबर ०६४८६१९००००४८९२ वर भरण्यास सांगितले. त्याप्रमाणे पिडीत महिलेने पैसे भरले. परंतु त्यानंतर मोबाईल नंबर ९६५७३४५८८४ यावर वारंवार फोन करुन देखील समोरील व्यक्ती फोन उचलत नसल्याने पिडीत महिलेची फसवणुक झाल्याचे तीच्या लक्षात आले. त्यानंतर पिडीत महिलेने सायबर क्राईम सेल येथे तक्रार दिली. सायबर सेलकडील चौकशीअंती सदरच्या तक्रारीवरुन चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन गु.र.नं. ५५/२०१८ भा.दं.वि.क. ४१९, ४२० सह माहीती तंत्रज्ञान अधि. २००८ चे कलम ६६(सी), ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्ह्याचा समांतर तपास सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखेमार्फत करण्यात येत होता. दाखल गुन्ह्यात वापरलेले बँक अकाऊंट व मोबाईल नंबर यांचे विश्लेषण करुन आरोपीचा शोध घेतला असता सदरची फसवणुक आरोपी नामे विक्रम अतार सिंग वय-३१ वर्ष रा. ए-१/ २०५, अक्षरा एलीमंटा, भुमकर चौक, वाकड, पुणे हा करीत असल्याचे निष्पन्न झाले. सायबर सेलने त्यास शिताफीने पकडुन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने अश्याप्रकारे अनेक लोकांची फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याच्यावर यापुर्वी विमानतळ पोलीस स्टेशन येथे अश्याच प्रकारचा गुन्हा दाखल असुन त्यास दाखल गुन्ह्यात अटक झाली आहे. त्याच्याकडे विविध बँकाचे एकुण ९ चेकबुक, ४ पासबुक, १ डेबीटकार्ड, ३ मोबाईल इत्यादी मुद्देमाल मिळुन आला. सदरचा मुद्देमाल गुन्ह्यात जप्त करण्यात आला असुन नमुद आरोपीस अटक करुन पुढील कारवाईकामी चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. चौकशीअंती असे निदर्शनास आले आहे की, अटक आरोपीने पुणे शहरामध्ये अश्याप्रकारे १०० पेक्षा जास्त लोकांची फसवणुक केली आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, मा. सपोआ श्री.निलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे, पो.उप-निरी. रुपाली पवार, पोलीस उप-निरी स्वामी, पो.शि. भारती/९९५०, म.पो.शि.ढहाळे/११०९१, म.पो.शि.पालवे/९४१९, पो.शि.बिच्छेवार/१०२०० यांनी केली.

याव्दारे नागरींकाना अवाहन करण्यात येते की, घरकाम करणाऱ्या महिला अथवा मेडची आवश्यकता असल्यास संबंधीत कंपनीच्या कार्यालायात जावुन प्रत्यक्ष चौकशी करावी. प्रत्यक्ष चौकशी न करता कुठल्याही अकाऊंटवर पैसे भरु नयेत. तसेच साई समर्थ इंटरप्रायजेस किंवा कृष्णा सोनवने या नावाने ज्यांची ज्यांची फसवणुक झाली असेल अश्या नागरीकांनी तात्काळ सायबर क्राईम सेल , पुणे शहर यांच्याशी संपर्क करावा.